# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-१२ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २४ ऑक्टोबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669




दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, २४ ऑक्टोबर २०२२



## ठाण्यात डेंग्यूचा प्रादुर्भाव

**ठाणे :** ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात डेंग्यू आणि मलेरिया रुग्णांचे प्रमाण गेल्या काही वर्षांपेक्षा यंदा नक्कीतच कमी असताना, सप्टेंबर महिन्यात डेंग्यू या आजाराने एक रुग्ण दगावला. ही गंभीर बाब लक्षात घेत, ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी आरोग्य विभागाला निर्देश देताना एक जणू फतवाच काढला आहे. डेंग्यूचा प्रत्येक संशयितरुग्ण रूग्णालयात दाखल झालाच पाहिजे. ती आपली जबाबदारी आहे. त्यांच्यासाठी वॉर्ड कायम उपलब्ध पाहिजे. सध्या तीन सक्रिय रुग्ण असेल तरी गाफील राहता येणार नाही. आठवडाभरातील संशयित रुग्णांचा, कोविड काळात करत होतो तसाच दैनंदिन पाठपुरावा ठेवावा, असे निर्देश दिले आहेत.

त्याचबरोबर, रुग्णांचे मॅपिंग करावे म्हणजे कोणत्या भागात प्रादुर्भाव आहे हेही कळू शकेल. त्यानुसार डासांची उत्पत्ती स्थाने शोधून ती नष्ट करण्यास मदत मिळेल. नियमित औषध फवारणी करावी, तसेच घरोघरी जावून तपासणी करण्याची मोहीम महापालिकेने हाती घेतली आली आहे. रुग्णाला पेटलेट्स,रक्त चाचण्या करण्यासाठी हॉस्पिटलबाहेर पाठवायचे नाही. त्याचा खर्च रुणांवर टाकायचा नाही, अशा स्पष्ट सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या. सध्यस्थितीत डेंग्यू व मलेरिया या आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने विशेष काळजी घेण्यात येत आहे.

## नागरिक आकलन सर्वेक्षणात प्रभाग समित्यांची भूमिका महत्त्वाची- स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी यांचे प्रतिपादन

**ठाणे :** स्मार्ट सिटी योजनेमध्ये झालेल्या कामांबद्दल नागरिकांना काय वाटते, त्याचे या प्रक्रियेचे आकलन काय आहे. त्यांना बदल जाणवतो का हे जाणून घेण्यासाठी केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय 'नागरिक आकलन सर्वेक्षण-२०२२' करणार आहे. त्यात प्रभाग समित्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे, असे प्रतिपादन स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारीअधिकारी संदीप माळवी यांनी सहाय्यक आयुक्ताबरोबरच्या बैठकीत केले. 'नागरिक आकलन सर्वेक्षण-२०२२' मध्ये नागरिकांना नोंदवलेली मते, गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय यांनी संकलित केलेली माहिती आणि ठाणे महापालिकेने संकलित केलेली शहराशी निगडित ३७२ विषयांची माहिती यांचा अभ्यास करून नागरिकांचा शहराच्या नियोजनाचे धोरण ठरवण्यातील सहभाग वाढवण्यासाठी मार्गदर्शक प्रणाली तयार होणार आहे. सध्या आता माहितीचे संकलन आणि प्रमाणीकरण करण्याचा टप्पा सुरू आहे. केंद्र सरकारद्वारे या माहितीची छाननी झाल्यावर ती नागरिकांसाठी खुली होईल. त्यामुळे या सर्वे क्षणाबद्दल नागरिकांना माहिती देणे, त्यांचा सहभाग वाढवणे ही जबाबदारी प्रत्येक प्रभाग समितीवर असल्याचे माळवी यांनी स्पष्ट केले.

शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी फलक लावणे, शाळा, महाविद्यालये तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये प्रचार मोहिमा करा राबवून नागरिकांचा सहभाग वाढवता येईल. त्याचप्रमाणे, कल्पकतेने वेगवेगळी अभियाने राबवावित, स्मार्ट सिटीमध्ये झालेल्या कामांची चित्रप्रदर्शने आयोजित करावीत, अशा सूचना माळवी यांनी सर्व सहाय्यक आयुक्तांना दिल्या.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## कोकणातील जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करावी

### आमदार निरंजन डावखरे यांची ग्रामविकास मंत्र्यांकडे मागणी



**ठाणे :** कोकणात काही वर्षांपासून सातत्याने अतिवृष्टी, पूर आणि चक्रीवादळामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या शाळांच्या दुरुस्तीसाठी ग्रामविकास विभागाने राज्यस्तरीय निधीतून तरतूद करावी, अशी मागणी कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली आहे.

कोकणाला दरवर्षी महापूर व चक्रीवादळाचा फटका बसत असून, जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी शाळा मोडकळीला आल्या आहेत. या शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून प्राप्त होणारा निधी अत्यल्प असल्याने शाळांची दुरुस्ती करता येत नाही. काही ठिकाणी पडझड झालेल्या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत आहे. त्यामुळे राज्यस्तरीय निधीतून जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्तीसाठी तरतूद करावी, अशी मागणी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे निवेदनाद्वारे आमदार डावखरे यांनी केली. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मंत्री महाजन यांनी दिले आहे.

## ज्येष्ठअभिनेते सचिन पिळगावकर यांना गंधार गौरव पुरस्कार जाहीर

### ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले यांनी केली पत्रकार परिषदेत घोषणा




**ठाणे :** मराठी चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार, चतुरस्त्र अभिनेते सचिन पिळगावकर यांना यंदाचा गंधार गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बालदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा १४ नोव्हेंबर २०२२ रोजी गडकरी रंगायतन येथे सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले यांनी मंगळवारी ठाण्यात पत्रकार परिषदेत दिली. पिळगांवकर हे कला क्षेत्रातील सचिन तेंडुलकर असल्याचे कौतुकोदगार त्यांनी काढले.

गंधार या बालनाट्य संस्थेच्यावतीने गंधार गौरव सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. यंदाचे हे सातवे वर्षे आहे. ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी, विद्या पटवर्धन, दिलीप प्रभावळकर, अशोक समेळ, नरेंद्र आंगणे, अतुल परचुरे यांना आतापर्यंत गंधार गौरव सोहळ्याने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाचा हा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते पिळगावकर यांना देण्यात येत आहे. मुंबई भाजपा अध्यक्ष, आमदार ॲड. आशिष शेलार आणि ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्या हस्ते पिळगावकर याना पुरस्कार देण्यात येणार आहे. मे महिन्यात गंधारतर्फे विविध जिल्ह्यांत गंधार गौरव बालनाट्य स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेसाठी ठाणे, मुंबई, नवी मुंबई, नाशिक, औरंगाबाद येथून प्रवेश आले होते. या स्पर्धेसाठी गोखले आणि अभिनेत्री हेमांगी वेल्हणकर यांनी परीक्षण केले. या स्पर्धेतील नामांकने देखील आज जाहीर करण्यात आली. या पत्रकार परिषदेला गंधारचे प्रा. मंदार टिल्लू, सुनील जोशी, अमोल आपटे, बाळकृष्ण ओडेकर आदी उपस्थित होते.

कलेच्या उद्यानात मुक्त विहार करणारे कलानंदी व्यक्तिमत्त्व म्हणजे पिळगावकर त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. त्यांच्यात कलेचा आनंद घेण्याची वृत्ती आहे - विजय गोखले

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# फक्त चार बदल सोडवणार स्टेशन परिसराची कोंडी

## आमदार संजय केळकर यांनी केली अधिकाऱ्यांसमवेत पाहणी

**ठाणे:** रोज दहा लाख प्रवासी झेलणाऱ्या ठाणे रेल्वे स्थानक परिसराची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आमदार संजय केळकर यांनी चार पर्याय आरटीओ आणि वाहतूक अधिकाऱ्यांना सुचवले आहेत. लवकरच पोलीस आयुक्तांच्या मंजुरीने प्रायोगिक तत्वावर या पर्यायांची अंमलबजावणी होणार असून नेहमीच्या वाहतूक कोंडीतून सर्वसामान्य नागरिकांची सुटका होणार आहे.

ठाणे शहराची लोकसंख्या २८ लाखांवर गेली असून रोज १० लाखांहून जास्त प्रवासी ठाणे रेल्वे स्थानकातून ये-जा करत असतात. कमी जागेत या लाखो प्रवाशांना सामावून घेताना या परिसराची दमछाक होते. शिवाय काही रिक्षाचालकांची अरेरावी आणि पदपथ-रस्ते अडवणारे बेकायदेशीर फेरीवाले येथील कोंडीत अधिक भर घालतात. त्यामुळे येथून घरी जाणाऱ्या नागरिकांना नाहक मनःस्ताप होतो. याच भागात राहणाऱ्या नागरिकांना घरी पोहोचण्यासाठी २० ते ३० मिनिटांचा वेळ लागतो तर ठाण्यातील इतर भागात जाण्यासाठी किमान पाऊण तास खर्च करावा लागतो. ठाणेकरांची या कोंडीतून सुटका व्हावी यासाठी आमदार संजय केळकर यांनी प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस विभाग यांची संयुक्त बैठक काल घेतली. त्यानुसार त्यांनी शुक्रवारी स्टेशन परिसराची संयुक्त पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात प्रवाशांची कोंडी कशामुळे होते याचे निरीक्षण करण्यात आले आणि चार बदल करण्याच्या सूचना आमदार केळकर यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

सध्या असलेला टॅक्सी स्टॅण्ड रेल्वेच्या बाजूला घेतल्यास टॅक्सी स्टॅण्ड परिसर मोकळा होणार आहे. त्यामुळे गोखले मार्गाकडे जाणाऱ्या प्रवाशांची वाट मोकळी होणार आहे. गोखले मार्गावर कायमस्वरूपी बॅरिकेट्स लावण्यात आले आहेत. ते काढून टाकल्यास स्टेशनहून डावीकडे या मार्गाने वाहने जाऊन स्टेशन परिसर मोकळा राहील. मीटर रिक्षाचे चालक त्यांना पाहिजे त्या ठिकाणचेच भाडे घेतात, त्यामुळे अनेक प्रवासी तिष्ठत उभे असतात. तर शेअर रिक्षा चालकांचीही मनमानी सुरू असते. यात बेकायदेशीरपणे व्यवसाय करणाऱ्या रिक्षाचालकांचेही प्रमाण मोठे आहे. या रिक्षाचालकांकडून प्रवासीभिमुख सेवा मिळावी यासाठी आरटीओ अधिकाऱ्यांनी नियमित तपासणी करण्याची सूचना केळकर यांनी केली. तर रिक्षा संघटनेच्या कार्यालयाच्या ठिकाणी २४ तास लक्ष ठेवणारी वाहतूक पोलीस चौकी सुरु करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या. या पाहणी दौऱ्यात वाहतूक शाखेचे पोलीस उपायक्त कांबळे, वेरणेकर, पांढरे, आरटीओचे अधिकारी नलावडे, माजी नगरसेवक संजय वाघुले, सुनेश जोशी व नागरिक उपस्थित होते.




**पाहणी दौऱ्यात दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी चार पर्याय सुचवले असून प्रायोगिक तत्वावर त्याची अंमलबजावणी करण्याबाबत मी आग्रही भूमिका घेतली आहे. पोलीस आयुक्तांसोबत लवकरच या बदलांबाबत संयुक्त बैठक होणार असून त्याबाबत नोटिफिकेशन काढण्यात येईल. हे बदल निश्चितच स्टेशन परिसरातील कोंडी सोडवतील आणि ठाणेकरांना सुरळीत आणि सुरक्षित घरी पोहोचता येईल.**

**– संजय केळकर**, आमदार

## भारत- पाक सामन्यासाठी दिवेकर आगरी कोळी तरुण मेलबर्न मैदानात

**ठाणे:** देशभरात एकीकडे दिवाळीची धामधूम सुरू असताना, रविवार पार पडलेल्या टी-२० विश्वचषकातील भारत- पाकिस्तान यांच्यातील जणू क्रिकेटचे युद्ध बघण्यासाठी थेट ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे ठाणे शहरामधील दिव्यासारख्या गावातील क्रिकेटप्रेमी आगरी- कोळी संदेश भगत, निलेश भोईर आणि मयूर भगत हे तीन तरुण आपल्या गेले होते.

विश्वचषकातील दोन्ही प्रतिस्पर्धी भारत- पाकिस्तान क्रिकेट संघातील सामना हा नेहमी रोमांचक असतो. तो सामना खास करून पाहण्यासाठी हे तीन जणांचे चमू ऑस्ट्रेलियाला गेले. या सामन्याचे तिकीट त्यांनी एक महिन्यापूर्वीच खरेदी केले होते. रविवारी मेलबर्न मैदानात दाखल होताना, ते खास पारंपरिक आगरी- कोळी टोप्या व 'एकविरा' आईचे फोटो असलेले टी-शर्ट परिधान केल्यामुळे ते आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. आपल्या गावातील व समाजातील तरुण भारत पाक सामना पाहण्यासाठी परदेशी गेल्यामुळे सर्वांनीच सोशल मीडियावर पोस्ट करून त्यांचे अभिनंदन केले. ते तिघे क्रिकेटप्रेमी असून त्यांनी या सामन्याची तिकीट आधीच बुक केली होती. तसेच तो सामना संपल्यानंतर ते भारत येणार असल्याची माहिती भगत यांच्या बंधू आदेश भगत यांनी दिली.




## ठाण्यातील गोळीबार प्रकरणी आणखी दोघांना अटक; दुसऱ्या घटनेतील जखमीचा मृत्यू

**ठाणे :** शुक्रवारी ठाणे शहरात काही तासांच्या अंतरावर नौपाडा आणि येऊर येथे वेगवेगळ्या दोन गोळीबाराच्या घटना घडल्या होत्या. यामध्ये अश्विन गमरे आणि गुंड गणेश जाधव उर्फ काळ्या गण्या हे दोघे जखमी झाले होते. त्यापैकी गणेश जाधव याचा उपचारादरम्यान रात्री मृत्यू झाला. तसेच १२ तासात पोलिसांनी दोघांना गजाआड केल्यानंतर आणखी दोघांना अटक केल्याने या घटनांमध्ये एकूण चार जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

शुक्रवारी पहाटेच्या सुमारास नौपाडा परिसरात गोळीबार झाला होता. त्यात गमरे याच्या गोळी लागून तो जखमी झाला. त्यानंतर त्याच हल्लेखोरांनी येऊर येथे कुख्यात गुंड गणेश जाधव याच्या खंडणीची मागणी केली होती. मात्र ती मागणी पूर्ण न केल्याने त्यांनी गणेश याच्या डोक्यात आणि मानेवर गोळी झाडली होती. उपचारार्थ त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु रात्री त्याचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. दरम्यान ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखा युनीट पाचचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके आणि नौपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हल्लेखोरांचा शोध सुरू होता. दरम्यान, याप्रकरणात विपीन मिश्रा याच्यासह सौरभ शिंदे या दोघांना मुलुंड नवघर परिसरातून अटक केली. तसेच घंटाळी येथून ये-जा करण्यासाठी एका रिक्षाचा वापर केला होता. त्यामुळे या रिक्षाचालकाचा पोलिसांकडून सुरू होता. दरम्यान, यातील रिक्षा चालक हा खारटन रोड परिसरात राहत असल्याची माहिती नौपाडा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी शशिकांत वटकर याला ताब्यात घेऊन अटक केली. तदपूर्वी सुरज मेहरा याला ही अटक केले. अशाप्रकारे या गोळीबारात आतापर्यंत चार जणांना जेरबंद केले अशी माहिती पोलिसांनी दिली.

## कळवा मुंब्रा दिवा व भिवंडीत टोरंटला स्थगिती द्या-काँग्रेसची मागणी

**ठाणे;**एमएसईबीचे खाजगीकरण करून कळवा-मुंब्रा-दिवा व भिवंडीमध्ये राबविण्यात येत असलेल्या टोरंटला तत्काळ स्थगिती द्या, अशी मागणी ठाणे शहर काँग्रेसने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

याबाबत बोलताना काँग्रेस शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी सांगितले की,संपूर्ण महाराष्ट्रात आज ठाणे हे केंद्रस्थानी आहे. मधल्या काळात ठाण्यातीलच मुख्यमंत्री असलेले मुख्यमंत्र्यांनी अनेक निर्णयांना स्थगिती देण्याचा सपाटाच लावला. टोरंटची अंमलबजावणी पासूनच या विरोधात जनतेमध्ये रोष व्यक्त होत होता, याच मतदारसंघातील खासदार श्रीकांत शिंदे यांनीही याचा विरोध केला होता, म्हणूनच जनतेला टोरंटबाबत मुख्यमंत्री चांगला निर्णय घेतील असा विश्वास वाटत होता. परंतु ठाण्यातील जनतेचा भ्रमनिरास झाला असून आता पुन्हा काँग्रेस पक्षामार्फत मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे टोरंटला त्वरीत स्थगिती द्यावी .तसेच कळवा,मुंब्रा,भिवंडी मधील नागरिकांना दिलासा द्यावा. असे चव्हाण यांनी शुक्रवारी ठाण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.यावेळी, काँग्रेस मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे, काँग्रेस उपाध्यक्ष भालचंद्र महाडिक, महिला अध्यक्षा वैशाली भोसले आदी पदाधिकारी उपस्थित होते

# दादोजी कोंडदेव स्टेडीयमचे काम जानेवारीत होईल पूर्ण

**ठाणे:** दादोजी कोंडदेव क्रीडांगण संकुलाला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांच्या दर्जाचे बनविण्याचा प्रकल्प गेल्या महिन्यापासून सुरू झाला आहे. त्याची पाहणीही आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळण्यासाठी तसेच, लाईव्ह एच डी प्रक्षेपण करण्यासाठी ३००० डणद क्षमतेइतकी प्रकाशव्यवस्था तयार केली जात आहे. त्यासाठी चार भव्य खांब उभारले जात आहेत. एका खांबावर प्रत्येकी १०२ एलईडी दिवे असतील. त्याचा खर्च १८ कोटी रुपये असून जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत काम पूर्ण होणार आहे. या कामात आंतरराष्ट्रीय क्रिकेट मंडळाच्या सर्व निकषांची सातत्याने पडताळणी करून घेण्यात यावी, अशी सूचना आयुक्तांनी केली.


स्टेडियममध्ये, गळतीमुळे खराब झालेले छत बदलण्याचे कामही सुरू आहे. सहा कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेले हे छत, तसेच, प्रेक्षागृहातील १०० पत्रकार बसू शकतील अशा प्रेस बॉक्सची जागाही त्यांनी पाहिली. या कामाच्या प्रगतीचा आढावा आयुक्तांनी घेतला. तसेच, दिलेल्या मुदतीत उत्तम दर्जाचे काम व्हायला हवे, हेही आयुक्तांनी पुन्हा स्पष्ट केले. त्यानंतर आयुक्तांनी शूटिंग रेंज, सय्यद मोदी बॅडमिंटन प्रशिक्षण केंद्र, अद्यावत व्यायामशाळा यांची पाहणी केली.



# मुंबई-नाशिक महामार्गावर कंटेनरचा अपघात

## रस्त्यावर केमिकल गळती

**ठाणे:** औषध निर्मिती साठी वापरात येणारे प्रोपेलिन ग्लायकोल हे केमिकल घेऊन जाणाऱ्या कंटेनरचा ठण्यातील कोपरी मुंबई नाशिक वाहिनीवर अपघात झाला. गुरुवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घडलेल्या घटनेत मोठ्या प्रमाणात रस्त्यावर केमिकल सांडले. तर, सुदैवाने सांडलेले केमिकल ज्वलनशील नसल्याने कोणालाही दुखापत झाली नाही. तसेच वाहतुक कोंडीही झाली नसल्याची माहिती ठाणे महापालिका प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



कंटेनर चालक देवीप्रसाद हा मे. पशुपती रोडलाईन मालकीचा कंटेनर घेऊन न्हावा शेवा येथून गुजरातला ठाणे मार्गे निघाला होता. त्या कंटेनरमध्ये २० गॅलन, प्रोपेलिन ग्लायकोल हे औषध निर्मितीसाठी वापरण्यात येणे केमिकल होते. चालक कंटेनर घेऊन मुंबई नाशिक वाहिनीवरील कोपरी,हरिओम नगर, आनंद नगर जकात नाका पुढे आल्यावर त्याचा अपघात झाला. त्यातून मोठ्या प्रमाणात केमिकल रस्त्यावर सांडले आहे. अशी माहिती मिळताच, घटनास्थळी कोपरी पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. मात्र सांडलेले केमिकल ज्वलनशील नसल्याचे स्पष्ट झाल्यावर सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही तसेच वाहतुक कोंडीचाही प्रश्न यावेळी निर्माण झाला नसल्याचेही आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सांगितले.

# विभागीय स्तरावरील ॲथलेटिक चॅम्पियनशिप; तीन सुवर्णपदकांसह ९ पदकांची कमाई



## पाचपैकी 'त्या' चौघांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**ठाणे:** मुंबई, प्रियदर्शनी पार्क येथे १७ ते १८ ऑक्टोबरला पार पडलेल्या उखडउए (भारतीय शालेय प्रमाणपत्र परीक्षेसाठी परिषद) विभागीय स्तरावरील ॲथलेटिक चॅम्पियनशिप स्पर्धेत ठाण्यातील खेळाडूंनी तीन सुवर्णपदकांसह ९ पदके आपल्या नावावर केली आहेत. तर चार खेळाडूंची ४ ते ६ नोव्हेंबर रोजी पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

१४ वर्षांखालील मुलींच्या गटात मिहिका सुर्वे हिने वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटरमध्ये सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तर त्याच गटात साईशा नायर हिला शॉट पुटमध्ये कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात नतालिया फर्नांडिस हिने ४०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्य पदक आणि १०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक जिंकले. त्याच गटात श्रेष्ठा शेट्टीने लांब उडीत रौप्यपदक मिळवले. याशिवाय १७ वर्षांखालील मुलांच्या गटात अथर्व भोईर याने १०० मीटर आणि २०० मीटरमध्ये दोन्ही स्पर्धांमध्ये वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह रौप्य पदक पटकावले. मिहिका सुर्वे, नतालिया फर्नांडिस, श्रेष्ठ शेट्टी आणि अथर्व भोईर या खेळाडूंची पुणे बालेवाडी, येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. हे खेळाडू ढचउझध येथे प्रशिक्षक नीलेश पाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.

सर्व खेळाडू चांगली कामगिरी करत आहेत. आम्ही प्रत्येक भेटीत सुधारणा करत आहोत. दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये विकासाचे काम सुरू असल्याने खेळाडूंनी काही प्रशिक्षण सत्रे चुकवली आहेत. या स्पर्धेत सर्वांनी वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली आहे. प्रशिक्षक म्हणून मी खूप समाधानकारक आहे. आम्ही कठोर परिश्रम करू आणि आगामी राष्ट्रीय स्पर्धेत चांगली कामगिरी करू. - नीलेश पाटकर, प्रशिक्षक.

# नवीमुंबईतून सव्वा कोटींचा खाद्य पदार्थांचा साठा जप्त; एफडीएच कारवाई

**ठाणे:** नवीमुंबईतील वाशी, तुर्भे आणि बेलापूर रोड अशाप्रकारे वेगवेगळ्या चार ठिकाणी बुधवारी केलेल्या तपासणीत ठाणे अन्न व औषध प्रशासनाने अंदाजे सव्वा कोटींचा खाद्यपदार्थांचा मुद्देमालाचा साठा जप्त केला आहे.

यामध्ये खाद्यतेल,मिरची, हळद,धनिया, मिक्स मसाला व गरम मसाला या अन्नपदार्थांचा समावेश आहे. तसेच सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध होण्यासह अन्नविषबाधेसारखी अप्रिय घटना घडू नये म्हणून प्रशासनामार्फत नियमितपणे अशा प्रकारच्या कारवाया भविष्यात देखील केल्या जातील असे संबंधित विभागामार्फत सांगण्यात आले. सणासुदीच्या काळात अन्नपदार्थांची मागणी वाढत असल्याने त्यात भेसळ होण्याची, अन्न पदार्थांचा दर्जा व गुणवत्ता घसरण्याची शक्यता दाट असते. दिवाळीच्या सणात प्रामुख्याने उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध अन्नपदार्थांचा गुणवत्ता व दर्जा यांची खात्री व खातरजमा करण्यासह सर्वसामान्य जनतेस सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# कळवा खाडी पुलाच्या एका मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात

## महापालिका आयुक्तांनी केली पाहणी



**ठाणे :** ठाणे – कळवा परिसरातील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करणाऱ्या तिसऱ्या कळवा खाडी पुलाच्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली. त्यावेळी, एका मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात असून उर्वरित दोन्ही मार्गिका ठरलेल्या मुदतीत पूर्ण होतील, हे कटाक्षाने पहावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नवीन कळवा पुल, के. व्हिला येथील ६७६ मीटरची 'मिसिंग लिंक' असलेला उड्डाणपूल, गावदेवी येथील भूमिगत वाहनतळ आणि दादोजी कोंडदेव क्रीडांगण येथे सुरू असलेल्या नवीन प्रकाश व्यवस्थेच्या कामाची पाहणी केली. शहर अभियंता प्रशांत सोनग्रा, उपनगर अभियंता (विद्युत) शुभांगी केसवानी, क्रीडा विभागाच्या प्रभारी उपायुक्त मिनल पालांडे, कळवा पूल प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता धनाजी मोदे, के. व्हीला पूल प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता संजय कदम, गावदेवी वाहनतळ प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता विकास ढोले आदी त्यांच्या प्रकल्पस्थळी उपस्थित होते.

कळवा पुलाच्या एका मार्गिकेची शिल्लक कामे तत्काळ पूर्ण करावीत. रंगरंगोटीची कामे ३० दिवसात झाली पाहिजेत. नवीन पुल असल्याने प्रत्येक गोष्ट बारकाईने तपासून घ्यावी, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले. मार्गिका (लेन) दुभाजक पांढऱ्या पट्ट्या 'आय आर सी' निकषांनुसार हव्यात. त्या सुबक पद्धतीने कराव्यात. दोन पट्ट्यांमध्ये पांढऱ्या रंगाचे शिंतोडे नकोत. सर्व कामे पूर्ण झाल्यवर रंगाचा शेवटचा थर (कोट) द्या, अशा सूचना आयुक्तांनी केल्या.

मध्यवर्ती कारागृहाकडील मार्गिका डिसेंबरपर्यंत तर साकेतकडील मार्गिका मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ते वेळापत्रक कटाक्षाने पाळावे. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढीसाठी प्रस्ताव आणू नये, असेही निर्देश आयुक्त बांगर यांनी दिले. ज्या ठिकाणी तिन्ही मार्गिका एकत्र येतात तेथे अपघात होऊ नये म्हणून दुभाजक, ड्रम अशी जी त्या परिस्थितीला योग्य वाटेल ती उपाययोजना करावी, असेही आयुक्तांनी सांगितले. नवीन कळवा पुल २.४ किमींचा आहे. त्याचे कार्यादेश २०१४ मध्ये देण्यात आले होते. त्यावर पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र मार्गिका आहे. तसेच, खाडीवरील १०० मीटरचे 'बास्केट हॅण्डल ट्रस' हे या पुलाचे वैशिष्ट्य आहे.

# काँग्रेसचे माजी नगरसेवक संजय घाडीगांवकर यांचा उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश

**ठाणे: ठाणे महानगरपालिकेमधील काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक संजय घाडीगांवकर यांनी गुरुवारी शिवसेनेत जाहीर प्रवेश करत घरवापसी केली. मातोश्रीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून त्यांच्यासोबत १५० जणांनी प्रवेश केला. तसेच घाडीगांवकर हे मुख्यमंत्री शिंदे यांचे वागळे इस्टेट परिसरातील राजकीय विरोधक असल्याने मुख्यमंत्री शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची ताकद वाढल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.**



दरम्यान, या प्रवेशानंतर घाडीगांवकर यांनी कोणावर आरोपप्रत्यारोप न करता भविष्यात ठाण्यात संघटना मजबूत करण्यासाठी झटणार आहोत. तसेच पुढील महिन्यात उद्धव ठाकरे हे आपल्या मागणीला मान्य देत, ठाण्यात जाहीर सभा घेणार असल्याचे ही संजय घाडीगांवकर यांनी बोलताना स्पष्ट केले.

घाडीगांवकर यांनी २००५ साली शिवसेनेला रामराम करत नारायण राणे यांच्या सोबत काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. ते काँग्रेसच्या तिकिटावर ठामपाचे सदस्य झाल्यानंतर त्यांनी गटनेते पद ही भूषविले आहे. तसेच २०१९ साली घाडीगांवकर यांनी काँग्रेसच्या तिकिटावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर विधानसभा निवडणूक लढवली होती. उद्धव ठाकरे गटाकडून घाडीगांवकर हे आगामी विधानसभेला कोपरी पांचपाखाडीतून मुख्यमंत्री शिंदे यांचे प्रतिस्पर्धी असू शकतात. २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत शिंदे आणि घाडीगांवकर यांच्यातील वाद थेट पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला होता.

घाडीगांवकर यांच्यासह मंगेश खातू, अशोक कल्होरी,स्वाती घाडीगांवकर, शुभांगी तावडे, पूजा तांदळे, बाळू पदीर , अमर पवार असे अंदाजे १५० कार्यकर्त्यांनी शिवसेनेत घरवापसी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे ,खासदार विनायक राऊत ,राजन विचारे ,जिल्हा प्रमुख केदार दिघे ,मधुकर देशमुख,प्रदीप शिंदे यांच्या उपस्थितीत झाली.

# गावदेवी मैदान महिना अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य

**ठाणे: स्मार्ट सिटी अंतर्गत बांधण्यात आलेल्या गावदेवी येथील भूमिगत वाहनतळाची पाहणी महापालिका आयुक्त बांगर यांनी बुधवारी केली. त्याचे बांधकाम, रंगकाम पूर्ण झाले आहे. त्याबद्दल आयुक्त बांगर यांनी समाधान व्यक्त केले. वाहनतळावरील आप्तकालीन यंत्रणा, प्रवासी आणि वाहनांची लिफ्ट, वायूवीजन सुविधा यांची खात्री करून घ्यावी. त्याचवेळी, वाहनतळावरील मैदान या महिनाअखेरपर्यंत नागरिकांना वापरण्यायोग्य करावे, असे त्यांनी सांगितले. फायर एक्झिट, अग्निशमन यंत्रणा, त्याला लागणारे पाणी सुरू करणारी स्वयंचलित यंत्रणा यांची सतत चाचणी घेतली जावी. त्याला लागणारी पाण्याची टाकी भरलेली आहे, यावर लक्ष ठेवावे.**

गावदेवी मैदानाची व्याप्ती ५६९० चौ. मी. एवढी आहे. त्यापैकी, ४३१० चौ. मी जागेवर वाहनतळाचे बांधकाम केले आहे. त्यात, १३० चारचाकी आणि १२० दुचाकी वाहने उभी राहण्याची सोय आहे. जानेवारी २०१९ मध्ये काम सुरू झालेल्या या योजनेवरील खर्च सुमारे ३० कोटी रुपये इतका आहे. या वाहनतळामुळे स्टेशन, गोखले रोड या परिसरावर असलेला वाहनांच्या पार्किंगचा भार कमी होण्यास मदत होईल.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज



# नूतन पोलीस अधीक्षकांनी रत्नागिरीचा स्वीकारला पदभार



**रत्नागिरी** – सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसह शांतता समिती आणि अन्य समित्यांच्या सदस्यांसोबत संवाद साधताना पहिल्या टप्यात रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना भेटी देणार आहे, असे रत्नागिरीचे नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

धनंजय कुलकर्णी यांनी रत्नागिरी जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. रत्नागिरी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग यांची बदली झाल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक पदी धनंजय कुलकर्णी यांची नियुक्ती झाली. आज धनंजय कुलकर्णी रत्नागिरीत दाखल झाले आणि त्यांनी तात्काळ जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी मावळते पोलीस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग उपस्थित होते. त्यांनी पोलीस अधीक्षक पदाचा पदभार धनंजय कुलकर्णी यांच्याकडे सुपूर्द केला.

# गुहागरातून दिवाळीसाठी नवीन एसटी बसफेऱ्या

**गुहागर :** आगारातून दिवाळी सणानिमित्त प्रवासाच्या सेवेसाठी विविध नवीन एस.टी. फेऱ्या सुरू करण्यात आल्याची माहिती आगारप्रमुख वैभव कांबळे यांनी दिली आहे. यामध्ये तुळजापूर, आंबेजोगाई, पुणे, चिंचवड, विरार, धोपावे, तळी, रत्नागिरी या मार्गावर नवीन फेऱ्या धावणार आहेत.

नवीन सुरू झालेल्या गाड्यांमध्ये दिनांक २० ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी पाच वाजता गुहागर- तुळजापूर सायंकाळी साडेसहा वाजता तुळजापूर- गुहागर, दिनांक २१ ऑक्टोबर व २२ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता गुहागर आंबेजोगाई, तर २२ ऑक्टोबरला सकाळी नऊ वाजता आंबेजोगाई गुहागर, दिनांक २० ऑक्टोबरपासून सकाळी सात वाजता गुहागर- पुणे चिंचवड, तसेच सकाळी सहा वाजता गुहागर- विरार गाडी सुरू झाली आहे. दिनांक १५ ऑक्टोबरपासून सकाळी साडेनऊ वाजता धोपावे, तळी, आबलोली, जाकादेवी, रत्नागिरी, तर सायंकाळी चार वाजता रत्नागिरी, जाकादेवी, आबलोली, तळी, गुहागर, तर सायंकाळी ५.२० वाजता रत्नागिरी पावस, दुपारी ३.१५ वाजता पावस रत्नागिरी अशा गाड्या सुरू करण्यात आल्या आहेत. या एस टी सेवेचा लाभ प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन केले आहे.

# पीक पाहणी नोंदीसाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ

**रत्नागिरी :** पीक पाहणी नोंदणीसाठी आता शेवटची मुदतवाढ देण्यात आली आहे. तिसऱ्यांदा मुदतवाढ देताना आता २२ ऑक्टोबरपर्यंत अंतिम तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

महसूल विभागाकडून शेतकरी स्तरावरील पीक पाहणीची नोंदणी करण्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत दोनदा मुदतवाढ देण्यात आली आहे. या आधी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यानंतर पुन्हा एकदा मुदतवाढ करून १५ ऑक्टोबरपर्यंत शेतकऱ्यांनी पीक पाहणी करावी, असे आवाहन करण्यात आले होते.

परंतु, असे असताना अजूनही काही शेतकरी हे पीक पाहणी करण्यापासून वंचित आहेत आणि त्यांनी अजूनही पीक पाहणी केलेली नाही. अशाच शेतकऱ्यांसाठी एक शेवटची संधी म्हणून पीक पाहणी करण्याकरिता २२ ऑक्टोबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. अंतिम मुदतीत ऑनलाईन नोंदी न झाल्यास शासनाकडून नैसर्गिक आपत्ती योजनेतून आर्थिक मदतीला मुकावे लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक पाहणी ॲपचा वापर करून नोंदणी करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# जिल्हा शल्यचिकित्सकांनी राजापूर, रायपाटण, लांजा ग्रामीण रुग्णालयांना दिली भेट, समस्या घेतल्या जाणून

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयाचा आढावा घेण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले यांनी राजापूर, लांजा आणि रायपाटण या ग्रामीण रुग्णालयांना अचानकपणे बुधवारी दुपारी भेटी दिल्या. यावेळी रुग्णांशी संवाद साधून समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

वैद्यकीय अधिकारी यांच्या कामात सातत्य आणि समाधानकारक कामगिरी दिसून आल्याची माहिती डॉ. संघमित्रा फुले यांनी दिली. डॉ. फुले यांनी कोणतीही कल्पना न देता ग्रामीण रुग्णालय तपासणी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी बायोमेट्रिक सिस्टीम तपासणी, रुग्ण नोंदणी, उपचार सातत्य या सगळ्या बाबींचा त्यांनी आढावा घेतला, इतकेच नव्हे, तर रुग्णांशी त्यांनी संवाद साधून अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

कर्मचाऱ्यांनाही काम करताना काही अडचणी आहेत का? याविषयी त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांच्याशी यावेळी चर्चा केली. राजापूर, रायपाटण आणि लांजा या तीनही ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचीही डॉ. फुले यांनी पाहणी केली.

# किसान क्रेडिट कार्डसाठी कृषि विभागाशी संपर्क साधावा

**रत्नागिरी:-** प्रधानमंत्री किसान सन्माननिधीच्या पात्र लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड देण्यासाठी फॉर्म भरून घेण्याची कार्यवाही कृषी विभागामार्फत गाव पातळीवर सुरू करण्यात आलेली आहे. ज्या शेतकऱ्यांना किसान सन्मान निधीचा लाभ मिळालेला आहे व ज्या शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड प्राप्त झालेले नाही अशा शेतकऱ्यांनी क्षेत्रीय पातळीवर कृषी विभागाच्या कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षक यांच्याशी संपर्क साधून किसान क्रेडिट कार्ड चा फॉर्म भरून देण्याबाबत सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रत्नागिरी यांनी केले आहे.

मातृमंदिर संस्थेच्यावतीने सलग पाच दिवस युवा संवाद शिबिराचे आयोजन


# मातृमंदिर संस्थेच्या वतीने युवा संवाद शिबिराचे आयोजन

**देवरूख :** मातृमंदिर संस्थेच्या वतीने दि. २ ते ६ नोव्हेंबर या कालावधीत युवा संवाद शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मातृमंदिरच्या फार्महाऊसवर प्रा. मधू दंडवते कृषी विद्यालय ओझरे देवरूख येथे होणाऱ्या शिबिरात १७ ते २३ वर्षे वयोगटातील युवकांना संधी दिली जाणार आहे. प्रवेशशुल्क ५०० रु. ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील दिग्गज मान्यवर, कृतीशील युवा कार्यकर्ते, समाजातील दुर्लक्षित घटक, दुर्गम भागातील जगण्याचा संघर्ष, निसर्गसंपन्न परंतु मागास भागाची ओळख, मानवतावादी चळवळ आदी विषयांवर शिबिरात चर्चा केली जाणार आहे. हळबे मावशी यांनी देवरूखसारख्या दुर्गम भागात सामाजिक कामाची सुरूवात केली. मातृमंदिरमध्ये आरोग्य विभाग, कृषी, औद्योगिक, बालशिक्षण, बालविकास, बचतगट, पाणीप्रश्न, ग्रामीण विकास असे प्रकल्प सुरू आहेत. यापूर्वीच्या शिबिराच्या माध्यमातून घडलेली पिढी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कार्यरत आहेत. शिबिरात सहभागी होण्यासाठी गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी सतिश शिर्के ९३७०६६८४८३, अश्विनी ७०८३११००२७, सुमित ७०२०८६०९४२, किरण ८४०१४९१७०९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मातृमंदिर संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

# बेकायदा रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई


## दोन कोटींचा मुद्देमाल नष्ट



**ठाणे:** खाडीमधून बेकायदेशीररित्या रेती उपसा करणाऱ्यांवर ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या आदेशानुसार कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. बुधवारी ठाण्यातील मुंब्रा - दिवा तसेच डोंबिवली व कोपर या खाडी ठिकाणी सात बोटींसह आठ सेक्शन पंप नष्ट करण्यात आला आहे. तर अंदाजे किंमत दोन कोटींचा मुद्देमाल नष्ट करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

नुकतीच ठाणे जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी यांनी बैठक घेत, बेकायदेशीररित्या खाडीतून रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश ठाणे निवासी नायब तहसीलदार, ठाणे, मुंब्रा, बेलापूर, बाळकुम मंडळ अधिकारी तसेच सर्व तलाठी यांना दिले. त्यानुसार पथकांची स्थापना करून बुधवारी सकाळी ६ वाजता सुरू झालेल्या धडक कारवाईत मुंब्रा - दिवा तसेच डोंबिवली व कोपर या खाडी ठिकाणी ५ बोटी व ७ सेक्शन पंप - खाडीमध्ये पाणी कमी असल्यामुळे पाण्यातून काढता येत नसल्याने पाण्यात बुडवून व आग लाऊन नष्ट करण्यात आले. तसेच २ बोटी व १ सेक्शन पंप मुंब्रा येथील गणेश घाट येथे आणून गॅस कट्टरच्या सहाय्याने कापण्यात आले. अशा प्रकारे एकूण अंदाजे २ कोटी रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.अशी माहिती ठाणे तहसीलदार युवराज बांगर यांनी दिली.

# अडकलेल्या चिमुरड्याची सुखरूप सुटका; अग्निशमन दलाच्या तोडला दरवाजा




**ठाणे:** स्वत:हून दरवाज्याची कडी लावल्यानंतर ती कडी पुन्हा काढता न आल्याने चार वर्षीय अथर्व तळेकर हा चिमुरडा अडकल्याची घटना बुधवारी सायंकाळी सहा वाजून १० वाजण्याच्या सुमारास दिवा-शीळ रोड येथे समोर आली. तर अग्निशमन दलाने काही तासातच रूमचा दरवाजा तोडून त्या चिमुरड्याची सुखरूप सुटका केली.

डवले,खर्डी नाका, दिवा-शीळ रोड, खर्डीपाडा येथे आशापुरा सिंफनी ही तळ अधिक १२ मजली इमारत आहे. या इमारतीत सातव्या मजल्यावर तळेकर कुटुंब वास्तव्यास आहे. बुधवारी सायंकाळी अथर्व हा घरात असताना त्याने अचानक रूम मधील बेडरूमच्या दरवाज्याची कडी लावली. त्यानंतर त्याला ती उघडता येत नसल्याने तो अडकला होता. ही माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली. तसेच रूमचा दरवाजा तोडून त्याची सुखरूप सुटका करत त्याच्या आईच्या ताब्यात दिले अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन न पाळल्यास; भाऊबीजेला बंगल्याबाहेर ओवाळनीचा कार्यक्रम

## महाराष्ट्र राज्य आशा-गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीचा इशारा

**ठाणे : महापालिका असो एसटी येथील कर्मचाऱ्यांना दिवाळीचा बोनस देण्यात येतो. मात्र, आशा स्वयंसेविकाना बोनस दिला जात नसून १२ महिन्याचे काम व तेरा महिन्याचा पगार हे सुत्र व्यवहारात आणले गेले आहे. त्यात नुकताच विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य आशा - गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीच्यावतीने मंत्रालयावर मोर्चा काढला असताना, शिष्टमंडळाबरोबर झालेल्या बैठकीत मागण्यांवर दिवाळी पूर्वी निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यातच, दिवाळी पूर्वी मागण्या मान्य न झाल्यास मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी भाऊबीजेच्या दिवशी ओवाळणीचा कार्यक्रम करण्यात येईल, असाच इशारा महाराष्ट्र राज्य अशा गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीने दिला आहे.**

राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ७० हजार आशास्वयसेविका व ४ हजार गटप्रवर्तक कार्यरत आहेत, त्यांच्या योगदानामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सामान्य नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध होते. कोरोना महामारीच्या काळामध्ये आशा स्वयंसेविकांनी कुटुंबियाची व जीवाची पर्वा न करता जीवावर उदार होऊन काम केले. त्याबद्दल त्यांचा आरोग्य आघाडीने सैनिक म्हणून खुप वाहवा झाली. युनोने देखील भारत देशातील आरोग्य खात्यातील आशा स्वयंसेविकाच्या कामाची नोंद घेऊन त्यांच्या कामाचा गौरव केला. महाराष्ट्रातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना त्यांच्या कामाचा मोबदला कधी न वेळेवर मिळत नाही, त्यांना मिळणारा मोबदला अत्यंत कमी व किमान वेतनाच्या खाली आहे. त्यातच औद्योगिक आस्थापना, निमशासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्था, अंगणवाडी कर्मचारी घरकाम कामगार या सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या अगोदर बोनस दिला जातो. परंतु आशा स्वयंसेविकाना बोनस दिला जात नाही. १२ महिन्याचे काम व तेरा महिन्याचा पगार हे सुत्र व्यवहारात आणले गेले आहे. या सर्व मागण्याकरिता ११ ऑक्टोबर २०२२ रोजी मंत्रालयावर मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याशी शिष्ट मंडळाची आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या मागण्याची सविस्तर चर्चा झाली होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांच्या मागण्यांसंदर्भात अर्थ विभागाशी चर्चा करून दिवाळीपूर्वी निर्णय घेण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

# नवीन रस्ता: के व्हीला ते साकेत पुलाची आयुक्तांकडून पाहणी



**ठाणे:** मीनाताई ठाकरे चौक ते के. व्हीला तसेच सेंट्रल मैदान - शनी मंदिर - जेल नाका या भागात वाहतूक कोंडी होते. ही कोंडी सोडवून वाहनांना थेट कळव्याकडे जाता यावे यासाठी पुलाची निर्मिती करण्यात येत आहे. 'मिसिंग लिंक' असलेल्या के. व्हीला ते साकेत या ६७६ मीटरच्या नवीन पुलाचे काम सुरू झाले आहे. त्याचा खर्च सुमारे ७५ कोटी आहे. त्याचीही पाहणी आयुक्तांनी केली.

या पुलाचे ३५ टक्के काम झाले असून प्रकल्पात २४३ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन बाकी आहे. पुनर्वसन जलदगतीने झाल्यास हे काम डिसेंबर २०२३ मध्ये पूर्ण होईल.

के. व्हीला जुन्या पुलाखाली नाल्यात कचरा अडकतो आणि परिसरात पावसाळ्यात खूप त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे हा पुल पाडून नवीन पुलाचे काम सुरू होणार आहे. या दोन्ही कामांचे नियोजन ती एकत्र संपतील अशा पद्धतीने करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

# जिल्ह्यातील अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना 'आनंदाचा शिधा' किटचे वाटप सुरू



**ठाणे :** अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेतील शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या 'आनंदाचा शिधा' किटच्या वाटपास गुरुवारी ठाणे जिल्ह्यात सुरुवात झाली. शहरीभागातील वाटपाची सुरुवात नौपाडा येथील शिधा वाटप केंद्रात आमदार संजय केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. याबरोबरच ग्रामीण भागातही शिधा वाटप केंद्रावरून किटचे वाटप सुरू झाले आहे.

दिवाळी सणानिमित्त राज्य शासनाच्या वतीने शिधावस्तूंचा संच अल्प दरात म्हणजेच शंभर रुपये प्रति संच या दराने अधिकृत शिधावाटप दुकानांमधून दिवाळी कालावधीत वितरीत करण्यात येणार येत आहे. जे शिधापत्रिकाधारक सध्या बायोमेट्रिक पध्दतीने अंत्योदय व प्राधान्य कुटुंब या योजनेअंतर्गत शिधाजिन्नस प्राप्त करीत आहेत, त्यांना या आनंदाचा शिधा योजनेचा लाभ मिळणार आहे. या संचामध्ये एक किलो साखर, एक किलो चणाडाळ, एक किलो रवा व एक लिटर पामतेल या वस्तूंचा समावेश आहे.

ठाणे परिमंडळातील उपनियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील ठाणे, भिवंडी, नवी मुंबई, भाईंदर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर इत्यादी महानगर तसेच नगरपालिका क्षेत्रात या किटचे वाटप सुरू करण्यात आले आहे. या कार्यक्षेत्राच्या अधिपत्याखाली १२ हजार ४८८ अंत्योदय व ५ लाख ९९ हजार ८७५ प्राधान्य शिधापत्रिका असे एकूण सहा लाख १२ हजार ३६३ लाभार्थ्यांना या दिवाळी भेटीचा लाभ महाराष्ट्र शासनामार्फत मिळणार आहे.

जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील शिधा वाटप केंद्रातून आनंदाचा शिधा किटचे वाटपही आजपासून सुरू झाले आहे. त्यानुसार, ग्रामीण भागातील १ लाख ५५ हजार लाभार्थ्यांना या किटचा लाभ होणार आहे. आतापर्यंत ६१ हजार किट प्राप्त झाले असून त्यापैकी ५७ हजार किट शिधावाटप दुकानांमध्ये पोचले आहे. या किटचे वाटप सुरू करण्यात आले आहे. शिधावाटप दुकानांमध्ये किट पोचल्यानंतर त्याचे तातडीने वाटप सुरू करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिल्या आहेत.

या योजनेसाठी पात्र असलेल्या नागरिकांनी या किटचा लाभ घ्यावे, असे आवाहन उपनियंत्रक ज्ञानेश्वर जवंजाळ यांनी केले आहे.




कै. दशरथ राघो मढवी
देवाज्ञा दि.१८/१०/२०२२

✻ दहावा विधी ✻
दि.२७/१०/२०२२ रोजी
सकाळी ९.०० वा.
म्हातार्डेश्वर मंदिर येथे.

✻ उत्तरकार्य ✻
दि.३०/१०/२०२२ रोजी
राहत्या घरी करण्यात येईल.

कार्यक्रम

शनिवार दि.२९/१०/२०२२ रोजी
रात्री ०८ ते ०९ या वेळेत
ह.भ.प.कु.वैष्णवी महाराज म्हात्रे यांचे
सुश्राव्य प्रवचन सेवा होईल.

रविवार दि.३०/१०/२०२२ रोजी
सकाळी १० ते १२ या वेळेत
वाणीभुषण ह.भ.प.गुरुवर्य श्री.जयेश महाराज भाग्यवंत
(आंभे-श्रीमलंगड) यांचे सुश्राव्य कीर्तन होईल.

कीर्तनासाथ-परिसरातील सर्व वारकरी बंधुवर्ग आणि भाविकजन

शोकाकूल
श्री.रमाकांत दशरथ मढवी
मा.उपमहापौर/मा.नगरसेवक/दिवा शहर प्रमुख
मढवी परिवार,दातिवली ग्रामस्त व शिवसेना दिवा शहर

भावपूर्ण श्रध्दांजली